# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा

बी.कॉम.प्रवेश माहितीपुस्तिका

- प्रस्तावना
- प्रवेश पात्रता
- उपलब्ध विषय
- अध्ययनाचे माध्यम
- प्रवेशशुल्क
- ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया
- अभ्यास केंद्रावरील प्रवेश प्रक्रिया
- प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे
- पाठ्यक्रम
- स्वयं-अध्ययन साहित्य
- प्राध्यापकांचे मार्गदर्शन / व्याख्याने
- परीक्षा पद्धती

S.P.P.U. - SODL

डॉ.अर्चना गोसावी
लेखन आणि संपादन
मुक्त व दुरस्थ
अध्ययन प्रशाळा

डॉ. वैभव जाधव
संचालक
मुक्त व दुरस्थ अध्ययन
प्रशाळा

**प्रस्तावना:**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या'**मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा**' या विभागाअंतर्गत बॅचलर ऑफ **कॉमर्स(बी.कॉम)**. या वाणिज्य शाखेतील ३ वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमासप्रवेश उपलब्ध आहेत. सदर प्रवेश हे **दूरस्थ शिक्षण** पद्धतीने दिले जातात (बहि:स्थ विद्यार्थी म्हणून कोणतेही नवीन प्रवेश दिले जात नाहीत). **विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली** यांचे परिपत्रकानुसार पारंपारिक पद्धतीतील पदवी आणि 'दूरस्थ शिक्षण' पद्धतीतील पदवी या समकक्ष (Equivalent) असतात.

दूरस्थ शिक्षण पद्धतीतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष पारंपारिक शिक्षण पद्धतीप्रमाणे (नियमित विद्यार्थी) नाही. विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचेकडून प्राप्त सूचनांनुसार दूरस्थ शिक्षण पद्धतीतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष सप्टेंबर २०२२मध्ये सुरु होईल.

सदर प्रवेश प्रक्रिया ही अंशतः ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. सदर प्रवेशासाठी विद्यापीठामध्ये प्रत्यक्षात जाण्याची आवश्यकता नाही. मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेने दूरस्थ पद्धतीने शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता अनेक अभ्यासकेंद्रे उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. त्यापैकी विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार एक अभ्यासकेंद्र हे विद्यार्थ्यांना निवडायचे आहे आणि तेथे आपली प्रवेशप्रक्रिया पूर्ण करायची आहे.

सदर अभ्यासकेंद्रे पुणे, अहमदनगर, नाशिक आणि सिल्वासा या जिल्ह्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठाशी संलग्नित काही निवडक महाविद्यालयांमध्ये आहेत.ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेवेळी अभ्यास केंद्र असलेल्या महाविद्यालयांची यादी विद्यार्थ्यांना उपलब्ध होईल. त्या यादीमधून विद्यार्थ्यांनी त्यांच्या सोयीने कोणतेही एक अभ्यास केंद्र (महाविद्यालय) प्रवेश घेण्यासाठी निवडायचे आहे.

S.P.P.U.-SODL

**प्रवेश पात्रता**

बी.कॉम.या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास प्रवेश घेण्यासाठी पुढीलपैकी कोणतीही एक शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे:

१. इंग्लिश विषयासह उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (१० + २) किंवा समकक्ष परीक्षा
२. माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १०वी) परीक्षेनंतर महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांचा ३ वर्षांचा पदविका अभ्यासक्रम किंवा समकक्ष
३. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (१० + २) परीक्षेनंतर महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांचा औशधनिर्माणशास्त्रातील २ वर्षांचा पदविका अभ्यासक्रम किंवा समकक्ष
४. मध्य प्रदेश शिक्षण मंडळ, भोपाळ यांची इंटरमेजिएट वाणिज्य / कला परीक्षा ४ विषयासह उत्तीर्ण ज्यापैकी १ विषय जनरल इंग्लिश आवश्यक
५. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (व्यावसायिक) (H.S.C. Vocational) (or MCVC)
६. महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे २ वर्ष कालावधीचे अभ्यासक्रम पूर्ण

'दूरस्थ शिक्षण' पद्धतीमध्ये प्रवेश घेण्यासाठी कोणतीही किमान / कमाल वयोमर्यादा नाही.

S.P.P.U. - SODL

**अभ्यासक्रम रचना**

बी.कॉम हा अभ्यासक्रम एकूण १३२ श्रेयांकांचा आहे.

सदर श्रेयांक पुढीलप्रमाणे विभागले आहेत:

## B.Com. (2022- Pattern) : Distance Mode-From A.Y. 2022-23

| | AECC | Core Courses | GE | AEC | DSE | Add on Courses | Total Credits |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **FYBCom** | Compulsory English (6) | C1 ( 8)<br>C2 (6)<br>C3 (6) | GE1 (6)<br>GE2 (6) | Language (6) | | | **44** |
| **SYBCom** | | C4 ( 6)<br>C5 (6)<br>C6 (6)<br>C7 (6)<br>C8 (6) | | | DSE1 (8 ) | 1.Environmental Studies (4) | **42** |
| **TYBCom** | | C9 (6)<br>C10 (8)<br>C11 (8)<br>C12 (8 ) | | | DSE2 (8)<br>DSE3 (8) | | **46** |
| **Total Credits** | **6** | **78** | **12** | **6** | **24** | **4** | **132** |

सदर १३२ श्रेयांक विद्यार्थ्यास किमान ३ वर्षामध्ये तर कमाल ६ वर्षामध्ये प्राप्त करणे आवश्यक आहे.

S.P.U. - SODL

**Choose Any Two Courses From The Following To .**

**Complete 4 + 4 = 8 Credit, Which Is Compulsory**

**Additional 8 Extra Credits (Not to be considered in calculating C.G.P.A.):**

**<u>(Choose Any One)</u>**
F.Y.B.Com: Human Rights. – 4 Credits.
**OR**
F.Y.B.Com.: Democracy, Election and Governance.–– 4 Credits
**OR**
F.Y.B.Com.: Online Certificate course / MOOCs. – 4 Credits.

**<u>(Choose Any One)</u>**
T.Y.B.Com.: Consumer Affairs- 4 Credits
**OR**
T.Y.B.Com.: CyberSecurity.–– 4 Credits
**OR**
T.Y.B.Com.: Scientific survey /Societal survey /Field Visit /Industrial visit. as per Course requirement– 4 Credit

**अभ्यासक्रमासाठी उपलब्ध विषय:**

प्रथम वर्षास <u>एकूण ७</u> विषय निवडणे आवश्यक आहे.

१. 111: Compulsory English. (AECC)
२. 112: Financial Accounting. (C1)
३. 113 : Business Economics.(C2)
४. पुढीलपैकीकोणताही<u>एक</u>विषय:
   114A :Business Mathematics & Statistics(C3)
   114B:Computer Concepts and Application.(C3)
५. पुढीलपैकीकोणताही<u>एक</u>विषय: (GE1)
   115A Organization Skill Development
   115B Banking and Finance
   115C Commercial Geography
   115D Defense Organization & Management in India
   115E Theory and Practice of Cooperation
   115F Managerial Economics
६. पुढीलपैकीकोणताही<u>एक</u>विषय(GE2)
   116A Essentials of E-Commerce
   116B Insurance and Transport
   116C Marketing and Salesmanship
   116D Consumer Protection and Business Ethics
   116E Business Environment & Entrepreneurship
   116F Foundation Course in Commerce
७. पुढीलपैकीकोणताही<u>एक</u>विषय:
   117A Additional English
   117B Marathi
   117C Hindi

S.P.P.U. - SODL

**Additional** 4 Extra Credits (Not to be considered in calculating C.G.P.A.):

**(Choose Any One)**
F.Y.B.Com: Human Rights. – 4 Credits
**OR**
F.Y.B.Com.: Democracy, Election and Governance.–– 4 Credits
**OR**
F.Y.B.Com.: Online Certificate course / MOOCs. – 4 Credits

**SY B.Com**

द्वितीयवर्षास <u>एकूण ७</u> विषय निवडणे आवश्यक आहे.

**Compulsory Subjects**

AECC Environmental Studies (Add ON)

201. Business Communication (C4)

202. Corporate Accounting(C5)

203 Business Economics (Macro)(C6)

204 Business Management(C7)

205 Elements of Company Law(C8)

**ऐच्छिक विषय**

पुढीलपैकी कोणताही <u>एक</u> विषय: (DSE 1)
206A. Business Administration

206B. Banking and Finance

206C. Business Laws and Practice

206E. Cost and Works Accounting

206G .Business Entrepreneurship

206H. Marketing Management

206K. Insurance, Transport and Tourism

S.P.P.U. - SODL

**Compulsory Subjects**

**TY B.Com**

तृतीय वर्षास एकूण ६ विषय निवडणे आवश्यक आहे.

301 . Business Regulatory Framework.(C9)

302. Advanced Accounting.(C10)

303 . Indian and Global Economic Development.(C11)

304 . Auditing &Taxation.(C12)

ऐच्छिक विषय

पुढीलपैकी कोणताही एक गट; (DSE2 & DSE3)

305A. Business Administration-II
306A. Business Administration-III

305B. Banking and Finance-II
306B. Banking and Finance-III

305C. Business Law and practices-II
306C. Business Law and practices-III

305E. Cost and Works Accounting-II
306E. Cost and Works Accounting-III

305G. Business Entrepreneurship-II
306G. Business Entrepreneurship-III

305H Marketing Management-II
306H. Marketing Management-III

305K. Insurance, Transport and Tourism-II
306K. Insurance, Transport and Tourism-III

**Additional 4 Extra Credits (Not to be considered in calculating C.G.P.A.):**

T.Y.B.Com.: Consumer Affairs- 4 Credits.
**OR**
T.Y.B.Com.: Cyber Security.— 4 Credits.
**OR**
T.Y.B.Com.: Scientific survey /Societal survey /Field Visit /Industrial visit. as per Course requirement – 4 Credit

S.P.P.U. - SODL

**अध्ययनाचे माध्यम**

ऑनलाईन प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्यास मराठी किंवा इंग्लिश माध्यम निवडता येईल. तथापि, अभ्यास साहित्याचे आणि परीक्षेचे माध्यम पुढीलप्रमाणे असेल:

| **विषय** | **माध्यम** |
|---|---|
| 111 Compulsory English,<br>112 Financial Accounting,<br>114A Business Mathematics & Statistics,<br>114B Computer Concepts and Application,<br>116 A Essentials of E-Commerce<br>117A Additional English | इंग्लिश |
| 117B Marathi | मराठी |
| 117C Hindi | हिंदी |
| Remaining All Subjects | इंग्लिश किंवा मराठी<br>(विद्यार्थ्याने जे निवडले आहे ते माध्यम) |

S.Y.B.Comपरीक्षेचे माध्यम पुढीलप्रमाणे असेल:

| **विषय** | **माध्यम** |
|---|---|
| 201. Business Communication<br>202. Corporate Accounting<br>206C. Business Laws and Practice<br>206E. Cost and Works Accounting | इंग्लिश |
| Remaining All Subjects | इंग्लिश किंवा मराठी<br>(विद्यार्थ्याने जे निवडले आहे ते माध्यम) |

T.Y. B.Com परीक्षेचे माध्यम पुढीलप्रमाणे असेल:

| **विषय** | **माध्यम** |
|---|---|
| 302. Advanced Accounting<br>305C. Business Law and practices-II<br>305E. Cost and Works Accounting-II<br>306C. Business Law and practices-III<br>306E. Cost and Works Accounting-III | इंग्लिश |
| Remaining All Subjects | इंग्लिश किंवा मराठी<br>(विद्यार्थ्याने जे निवडले आहे ते माध्यम) |

S.P.U.-SODL

**प्रवेशशुल्क:**

प्रवेश शुल्कामध्ये प्रवेश शुल्क, परीक्षा शुल्क, स्वयं-अध्ययन साहित्य शुल्क यांचादेखील समावेश असल्याने ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेवेळी प्रवेश शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरल्यानंतर इतर कोणतेही शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

**ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया:**

ऑनलाईन प्रवेश प्रक्रियापूर्ण करणेसाठी प्रशाळेतर्फे sppuoa.digitaluniversity.ac हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.सदर संकेतस्थळावरील पुढील लिंक्सवर ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबद्दल सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.

https://sppuoa.digitaluniversity.ac/esuvidha/instructionFinal/SavitribaiPhulePune.pdf

https://youtu.be/RAHj5oNbqIg

प्रवेशासाठी कोणतीही प्रवेश परीक्षा अथवा गुणवत्ता यादी असणार नाही. “प्रथम येणाऱ्यास प्राधान्य” या तत्वावर उपलब्ध मर्यादित जागांसाठी प्रवेश दिले जातील.

ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेदरम्यान अपलोड करण्यासाठी विद्यार्थ्याचा पासपोर्ट आकाराचा फोटो आणि विद्यार्थ्याची सही यांच्या स्कॅन केलेल्या प्रती आवश्यक आहेत.

**अभ्यास केंद्रावरील प्रवेश प्रक्रिया:**

ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर प्रवेश अर्जाची PDF फाईल तसेच प्रवेश शुल्क पावती डाऊनलोड करून त्याची प्रिंट काढून घ्यावी. सदर प्रवेश अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह आपण निवडलेल्या अभ्यास केंद्रावर तातडीने जमा करणे आवश्यक आहे. प्रवेशासाठीचा अंतिम दिनांक दि. १५ सप्टेंबर २०२२ असल्याने आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रवेश अर्ज दि. १५ सप्टेंबर २०२२पर्यंत अभ्यास केंद्रावर जमा करणे आवश्यक आहे, अन्यथा विद्यार्थ्याचा प्रवेश अर्ज रद्द होईल. विद्यार्थ्यास अभ्यास केंद्रामध्ये जाणे शक्य नसल्यास तो प्रवेश अर्ज व कागदपत्रे जमा करणेसाठी आपला प्रतिनिधी पाठवू शकतो. परंतु, विद्यार्थ्यांच्या मूळ कागदपत्रांची तपासणी आवश्यक असल्यामुळे टपालाने अथवा कुरियरने पाठवलेले प्रवेश अर्ज स्वीकारले जाऊ शकत नाहीत.

विद्यापीठाद्वारे प्रवेश अर्जांची पडताळणी होऊन सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर PRN क्रमांक प्राप्त होतील. त्यानंतर विद्यार्थ्यांनी निवडलेल्या अभ्यास केंद्रावर प्राध्यापकांची मार्गदर्शनपर सत्रे सुरु होतील.

S.P.P.U. - SODL

**प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे:**

ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर अभ्यास केंद्रावर प्रवेश अर्ज जमा करतेवेळी पुढील कागदपत्रे सादरकरावीत:

१) प्रवेश अर्ज (अभ्यास केंद्र प्रत)

२) प्रवेश अर्ज (विद्यार्थी प्रत)

३) आधार कार्ड (मूळ प्रत व झेरॉक्स)

४) पात्र परीक्षेचे गुणपत्रक (मूळ प्रत व झेरॉक्स)

५) पुढीलपैकी <u>एक</u> कागदपत्र (जे लागू असेल ते)

i) शाळा / कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा दाखला (मूळ प्रत) (Leaving Certificate)

ii) स्थानांतर प्रमाणपत्र(मूळ प्रत)(Transfer Certificate)

iii) स्थलांतर प्रमाणपत्र (मूळ प्रत)(Migration Certificate)

**i) शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा दाखला (Leaving Certificate) पुढील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आहे:**

मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेमध्ये प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्य माधामिक व उच्च माध्यमिक मंडळामधून 'नियमित (Regular) विद्यार्थी' म्हणून इयत्ता १२वीची परीक्षा उतीर्ण असल्यास 'शाळा / कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा दाखला' (**<u>Leaving Certificate</u>**) (मूळ प्रत) आवश्यक असेल.

**ii) स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) पुढील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आहे:**

मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेमध्ये प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये किंवा संलग्नित महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला असल्यास त्या महाविद्यालयाने / विद्यापीठ विभागाने दिलेले 'स्थानांतर प्रमाणपत्र' (**<u>TransferCertificate</u>**)(मूळ प्रत)आवश्यक असेल.

**iii)स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) पुढील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आहे:**

१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातून इयत्ता १२वीची परीक्षा बहि:स्थ / खाजगी विद्यार्थी म्हणून उत्तीर्ण असल्यास

२) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाव्यतिरिक्त इतर शिक्षण मंडळातून उच्च माध्यमिक प्रमाणपत्र / पदविका / व्यवसाय प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असल्यास जसे की:

१. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ
२. महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ
३. राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद
४. राष्ट्रीय मुक्त विद्यालयीन शिक्षण संस्था (N.I.O.S.)

S.P.P.U.-SODL

५. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (C.B.S.E.)
६. कौन्सिल ऑफ इंडियन स्कूल सर्टिफिकेट एक्झामिनेशन (C.I.S.C.E.)
७. अन्य राज्यातील शिक्षण मंडळ
८. आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ जसे की C.A.I.E., I.B. इ.

प्रवेशासाठी खंड प्रमाणपत्र (गॅप सर्टिफिकेट)ची आवश्यकता नाही.

**महत्वाची सूचना:**

१) **विद्यार्थ्यास स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) जमा करणे आवश्यक असल्यास अशा विद्यार्थ्यांनी स्थानांतर प्रमाणपत्र (TC) जमा करण्याची आवश्यकता नाही.**

२) अभ्यास केंद्रावर प्रवेश अर्ज जमा करतेवेळी विद्यार्थ्यासस्थलांतर प्रमाणपत्र(Migration Certificate) मिळाले नसेल, तरीही विद्यार्थ्यास प्रवेश अर्ज जमा करता येईल. अशा विद्यार्थ्यांनी **स्थलांतर प्रमाणपत्र**मिळविण्यासाठी केलेल्या अर्जाच्या पावतीची प्रत ही प्रवेश अर्जासोबत जोडावी.स्थलांतर प्रमाणपत्र मिळाल्यानंतर ते मुक्त अध्ययन प्रशाळेकडे जमा केल्याशिवाय अशा विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित होणार नाही.

**पाठ्यक्रम:**

नियमित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विद्यापीठ मान्यताप्राप्त जो पाठ्यक्रम (syllabus) लागू आहे तोच पाठ्यक्रम दूरस्थ शिक्षण पद्धतीतील विद्यार्थ्यांना देखील लागू आहे. सदर पाठ्यक्रम (syllabus) प्रशाळेच्या unipune.ac.in/sol या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

सर्व अभ्यास केंद्रांवर समान पाठ्यक्रम असेल. अभ्यासकेंद्र हे स्वायत्त महाविद्यालयामध्ये असले तरीदेखील पाठ्यक्रम हा प्रशाळेचाच असेल (स्वायत्त महाविद्यालयाचा पाठ्यक्रम लागू असणार नाही).सर्व अभ्यासकेंद्रावर सर्व विषय उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यास कोणत्याही अभ्यासकेंद्रावर कोणताही विषय निवडता येईल.

**स्वयं-अध्ययन साहित्य:**

सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना विद्यापीठमान्य अभ्यासक्रमानुसार तयार केलेले ‘स्वयं-अध्ययन साहित्य’ (सर्व विषयांची पुस्तके) उपलब्ध करून देण्यात येतात. छापील पुस्तके विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यास केंद्रावर उपलब्ध करून देण्यात येतील.

S.P.P.U. - SODL

**प्राध्यापकांचे मार्गदर्शन / व्याख्याने**

'दूरस्थ शिक्षण' पद्धतीमध्ये 'पारंपारिक शिक्षण' पद्धतीप्रमाणे महाविद्यालयामध्ये नियमितपणे जाणे आवश्यक नाही. प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रथमतः उद्बोधनपर 'ओळख वर्ग' आयोजित केला जातो.तसेच, विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या पुस्तकांचा वापर करून स्वयं-अध्ययन कसे करावे याबाबत तज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाते. यासाठी प्रत्येक विषयासाठी मार्गदर्शनपर **संमंत्रण सत्रे** (academic counselling sessions) ही रविवारी / सुट्टीच्या दिवशी आयोजित केली जातात.

सदर सत्रांमध्ये संबंधित विषयाची तसेच त्या विषयाच्या अभ्यासक्रमाची ओळख करून दिली जाते. तसेच 'दूरस्थ शिक्षण' पद्धतीमध्ये 'स्वयं-अध्ययन' हे अत्यंत महत्वाचे असल्याने अभ्यास साहित्य (पुस्तके)वापरून 'स्वयं-अध्ययन' कसे करावे यासंबंधी मार्गदर्शन केले जाते. तसेच विद्यार्थ्यांना येणाऱ्या संबंधित विषयाच्या अडचणी / शंका यांचे निरसन देखील सदर सत्रांमध्ये केले जाते.तरी सदर सत्रांमध्ये सक्रियपणे सहभागी होणे विद्यार्थ्यांच्या हिताचे आहे. सदर सत्रे ही ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात येतात.

**परीक्षा पद्धती**

बी.कॉम. अभ्यासक्रमासाठी 'वार्षिक' परीक्षा पद्धती आहे. शैक्षणिक वर्षाच्या शेवटी ७० गुणांकरिता 'वार्षिक' परीक्षा घेतली जाते. तसेच,अभ्यास केंद्राद्वारे घेण्यात येणाऱ्या अंतर्गत परीक्षेसाठी ३० गुण राखीव असतात. प्रत्येक विषयामध्ये उत्तीर्ण होण्यासाठी 'अंतर्गत परीक्षा' आणि 'वार्षिक परीक्षा' या दोन्हीपरीक्षांमध्ये किमान ४० % गुण मिळवून स्वतंत्रपणे उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.कोणत्याही विषयामध्ये उत्तीर्ण होण्यासाठी अंतर्गत परीक्षेत ३० पैकी किमान १२ गुण आणि वार्षिक परीक्षेमध्ये ७० पैकी किमान २८ गुण मिळवणे आवश्यक आहे. वार्षिक परीक्षा ही मुक्त अध्ययन प्रशाळेच्या अभ्यासकेंद्रावरच होईल.

प्रत्येक विषयामध्ये अंतर्गत आणि वार्षिक अशा दोन्ही परीक्षेत किमान ४० % गुण मिळाल्यानंतर विद्यार्थ्यास त्या विषयाचे श्रेयांक प्राप्त होतील. प्रथम वर्षाच्या ६ विषयांच्या ४४ श्रेयांकापैकी किमान २२ श्रेयांक प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थी द्वितीय वर्षाच्या प्रवेशास पात्र राहील. तथापि, तृतीय वर्षास प्रवेश घेतेवेळी प्रथम वर्षातील सर्व ४४ श्रेयांक प्राप्त करणे आवश्यक असेल (प्रथम वर्षाचे सर्व विषय उत्तीर्ण असणे आवश्यक असेल). प्रथम वर्षास प्रवेश घेतल्यापासून जास्तीत जास्त ६ वर्षांमध्ये अभ्यासक्रम पूर्ण करता येईल.

S.P.P.U. - SODL

प्रवेशासंदर्भात काही शंका असल्यास आपण निवडलेल्या अभ्यास केंद्राशी संपर्क साधता येईल.
अभ्यास केंद्राचा संपर्क तपशील प्रशाळेच्या unipune.ac.in/sol या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

S.P.P.U. - SODL